महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, MIRAJ
Website: gmcmiraj.edu.in Email: deangmcmiraj@yahoo.co.in Phone: 0233/2232090-99 Fax: 0233-2231959

जा.क्र.शावैममि/अ/कपनि/जाहिरात/ ११७ /२०२५, दिनांक: ६ /०१/२०२५

## :: जाहिरात ::

विषय :- चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची रिक्त पदे करार पध्दतीने ३६४ दिवसांकरीता भरणेबाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एलईसी-२०२१/प्र.क्र.११९/वैसेवा-३, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२
२) शासन निर्णय क्र. एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३, दिनांक २१ ऑगष्ट, २०२४

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज आणि आरोग्य शिक्षण पथक, तासगांव या आस्थापनेवरील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विभागातील वैद्यकिय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता प्राध्यापक गट-अ व सहयोगी प्राध्यापक गट-अ संवर्गातील रिक्त् असलेली पदे करार तत्वावर ३६४ दिवसांकरिता तात्पुरत्या नियुकतीने भरण्याकरिता त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त् झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे (अर्ज करतानाचे अधिकतम वय ६९ वर्षपर्यंत) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त्) अशा उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. (सोबत अर्जाचा नमुना दिलेला आहे. तसेच सदर अर्ज कार्यालयातील आस्थापना शाखेत उपलब्ध आहेत)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज या संस्थेच्या gmcmiraj.edu.in या संकेतस्थळावर **जाहिरात प्रसिध्द झाल्यानुसार दिनांक ०७ -०१-२०२५ पासून ते १८-०१-२०२५ रोजी सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत (शासकीय सुटटी वगळून) अर्ज, अर्जासोबत जोडलेल्या आवश्यक त्या सर्व सहपत्रांसह व्दिप्रतीत या कार्यालयातील आवक विभागात प्रत्यक्ष स्विकारले जातील.** ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत प्रमाणित करुन या कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहील. करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर, सूचनाफलकावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

(डॉ.प्रकाश द.गुरव)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

# संस्थेचे नांव :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

## रिक्त् पदांचा तपशिल

| अ.क्र. | विषयाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | पात्रता |
|---|---|---|---|---|
| **चिकित्सालयीन विषय संवर्ग : "प्राध्यापक"** | | | | As per Notification १४.०२.२०२२<br>१) Associate Professor in the subject for ३ years in a permitted/Approved/recognized Medical college/Institution.<br>२) Should have at least four Research Publications (at least two as Associate Professor) (Only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, PubMed, Central Science Citation index, Science Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess Journals (DoAJ) will be considered). The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br>३) Should have completed the **Basic course in Biomedical Research** from institution (s) designated by NMC.<br>४) Should have completed the **basic, Revised Basic Course in Medical Education Technology** from Institute designated by NMC. |
| १ | स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र | १ | MD/MS/DNB in the concerned subject | |
| २ | क्षयरोगशास्त्र | १ | | |
| ३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ | | |
| ४ | मनोविकृतीशास्त्र | १ | | |
| **अचिकित्सालयीन विषय संवर्ग : "सहयोगी प्राध्यापक"** | | | | As per Notification १४.०२.२०२२<br>१) Assistant Professor in the subject for ४ years in a permitted/ Approved/ recognized Medicial college/Institution.<br>२) Should have at least Two Research Publications, (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess Journals (DoAJ) will be considered). The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br>३) Should have completed the **Basic course in Biomedical Research** from institution (s) designated by NMC.<br>४) Should have completed the **basic, Revised Basic Course in Medical Education Technology** from Institute designated by NMC. |
| १ | शरीररचनाशास्त्र | २ | MD/MS/DNB in the concerned subject | |
| २ | शरीररक्रियाशास्त्र | २ | | |
| ३ | जीवरसायनशास्त्र | १ | | |
| ४ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | | |
| ५ | विकृतीशास्त्र | १ | | |
| ६ | प्रादेशिक रक्तपेढी | १ | | |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | २ | | |
| ८ | जनऔषधवैद्यकशास्त्र | १ | | |
| ९ | जनऔषधवैद्यकशास्त्र आ.शि.प. तासगांव | १ | | |
| **चिकित्सालयीन विषय संवर्ग : "सहयोगी प्राध्यापक"** | | | | *** ५) For Appointment of Associate Professor Emergency Medicine required :-** वरील १ ते ४ पात्रतेसह, MD/DNB in the subject of Emergency Medicine OR During Transition Period MD/MS/DNB in broad speciality subject (General Medicine, Respiratary Medicine, Anaesthesiology, Gen.Surgery, Orthopaedics) having special training for three years in the Emergency Medicine in a teaching institution. |
| १ | औषधवैद्यकशास्त्र | १ | MD/MS/DNB in the concerned subject | |
| २ | कान, नाक व घसाशास्त्र | १ | | |
| ३ | नेत्रशास्त्र | २ | | |
| ४ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | २ | | |
| ५ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ | | |
| ६ | ईमर्जन्सी मेडिसीन * | १ | | |

टिप:- सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे / सदरची जाहिरात पूर्णत: रदद करण्याचा अधिकार निम्न्स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

**महत्वाची टिप :-**

१) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर करार पध्दतीने नियुक्तीसाठी कोणत्याही वयोगटाचे (अर्ज करतानाचे अधिकतम वय ६९ वर्षपर्यंत) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील. बिगर सेवानिवृत्त अर्जदारांनी कार्यरत संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

४) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल.)

५) मुलाखतीला येताना उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत आणणे बंधनकारक राहील.

मानधन :-

| अ.क्र. | पद | करार पध्दतीने दरमहा मानधन |
|---|---|---|
| ०१ | प्राध्यापक | रु.१,८५,०००/- |
| ०२ | सहयोगी प्राध्यापक | रु.१,७०,०००/- |

अटी व शर्ती :-

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा सदर पदासाठी म.लो.आ. शिफारशीने अथवा आस्थापना मंडळामार्फत् पदोन्नतीने शासनाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तुणक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांने प्रस्थापित मानंकानुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी वेळोवेळी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४) वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही. याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यांची मुभा राहील.

५) उपरोक्त प्रमाणे दरमहा एकत्रित ठोक मानधनाशिवाय इतर कोणतेही भत्ते व आर्थिक लाभ उमेदवारास अनुज्ञेय असणार नाहीत.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी हा कोणत्याही नियमित शासकीय सेवा प्रयोजनासाठी हक्क म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ ८ दिवस नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

१०) अर्जदाराने नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**उपरोक्त अटी व शर्तीशिवाय खालील अटी व शर्ती याप्रकरणी नव्याने लागू राहतील**

१) उमेदवाराच्या कामकाजाचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभाग प्रमुखानी दर तीन महिन्यांनी उमेदवाराच्या कामकाजाचा तपशीलवार आढावा स्वतःच्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांना सादर करावा.

२) संबंधित विषयाच्या पदव्युत्तर अथवा पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून उमेदवाराच्या शैक्षणिक कामकाजासंदर्भात मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने अभिमत (Feedback) घेण्यासाठी अध्यापक कौशल्य, वक्तशीरपणा, सचोटी इत्यादी निकषाच्या अधारे निश्चित करण्यात आलेल्या दहा गुणांच्या प्रश्नावलीवर गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

३) रुग्णसेवेसंदर्भात अभिमत (Feedback) घेण्यासाठी काही प्रसंगी रुग्णांकडून स्वतंत्र प्रश्नावलीच्या आधारे गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

४) उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास व संस्थेची निकड असल्यास उमेदवारास प्रथम नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत तात्रिक खंड देऊन पुढील ३६४ दिवसांकरिता पुनर्नियुक्ती देता येईल. तथापि अशा प्रकारच्या पुनर्नियुक्ती उमेदवाराने त्याच्या वयाची ७० वर्षे पूर्ण केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असणार नाहीत.

५) पुनर्नियुक्ती देण्यासाठी संबंधित विभागप्रमुखांनी अधिष्ठाता यांना स्वतःच्या अभिप्रायासह सादर केलेले तिमाही अहवाल तसेच प्रश्नावलीबाबतचे अभिलेख स्वतःच्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांनी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना सादर करणे आवश्यक राहील. तिमाही अहवाल समाधानकारक असल्यास त्याचप्रमाणे दहा गुणांच्या प्रश्नावलीत उमेदवारास किमाण आठ गुण प्राप्त होत असल्यास उमेदवारास आयुक्तांच्या मान्यतेने पुनर्नियुक्ती देता येईल.

६) उमेदवारास प्रथम नियुक्ती अथवा पुनर्नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र ५०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर उमेदवाराने रुजू होण्यापुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. तसेच त्यांना अनुभव प्रमाणपत्र अथवा कार्यमुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

७) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

८) अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(डॉ.प्रकाश द.गुरव)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

Government of Maharashtra

Directorate of Medical Education & Research | Government Medical College, Miraj

## Application Form

| | | |
|---|---|---|
| Application No. | | Applicant Photo |
| Subject | | |
| Name of the post | | |
| Application Date | | |

❖ **Candidate Details :**

| | | | |
|---|---|---|---|
| Candidate Name | | | |
| Address | | | |
| Date of Birth | | | |
| Applicatnt Category | | E mail: | |
| Aadhar No | | MMC Registration No | |
| Mobile No | | Phone No | |
| Name of Government /Semi Government Organization | | | |
| Retirement date | | To | |
| Approved Retirement Salary | | | |

❖ **Educational Details :**

| Sr. No. | Exam Name | Passing Year | Subject | Board/ University Name | Exam Format | Total Marks | Obtained Marks | Percentage | Grade |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |

❖ **Additional Qualification Details:**

❖ **Research Paper Details:**

| Sr. No. | Research Paper | National Publish Year | International Publish Year | First/Second/Third/ Corresponding auther | Indexed in |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |

❖ **Teaching Experience :**

| Sr. No. | Post Name | Name of the University/Institute | From Date | To Date | Period in Year | Period in Month/days |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Senior Residant | | | | | |
| 2 | Assistant Porfessor | | | | | |
| 3 | Associate Professor | | | | | |
| 4 | Professor | | | | | |

❖ **Documents Details :**

| Sr.No. | Document Name | |
|---|---|---|
| 1 | Passport Size Color Photo | |
| 2 | SSC Passing, Matriculation Certificate and Marksheet | |
| 3 | HSC Passing Certificate and Marksheet | |
| 4 | MBBS, MD/MS/DNB all Marksheets & Attempt Certificate | |
| 5 | MBBS, MD/MS/DNB Degree Certificate | |
| 6 | Additional Qualification in consent subject (DNB/CPS/PhD/Fellowship) | |
| 7 | Experience Certificate | |
| 8 | Research publications in NMC required index journals (candidate needs to attach complete article copy from journals) | |
| 9 | Age, Nationality, Domicille Certificate | |
| 10 | Caste, Caste Validity Certificate & Non creamy layar certificate as applicable | |
| 11 | **Basic course in Biomedical Research Certificate** | |
| 12 | **Basic, Revised Basic Course in MET Certificate** | |

Date: Signature of the Candidate:-

प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेबाबत..

शोधनिबंधाबाबत सविस्तर माहिती (सोबत कागदपत्रे जोडावीत)

उमेदवाराचे नांव :-

ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्याचे पदनाम :-

| Publication Type (National/International) | Publication Year | Publication Number | Title of Article | Publication Details (Original Article Case Report etc.) | Auther | Auther type (First / Second) | Publisher Name & address | Article Indexed Yes/No | If Indexed Which Index (MEDLINE/PUBMED/DOAJ/SCIENCE CITATION INDEX/CITATION INDEX/EXPANDED EMBASE/SCOPUS/INDEX COPERNICUS) | Designation as Held when the research article is published |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

असे प्रमाणित करण्यांत येते की, वरील तक्त्यामध्ये नमूद केलेली माहिती सत्य् असून, सदर माहिती चुकीची /दिशाभुल करणारी आढळून आल्यास, त्याबाबत मी कायदेशीर हीस पात्र राहील.

उमेदवाराची स्वाक्षरी व नांव :-